MHNS140003372026

फौजदारी किरकोळ अर्ज क्र.२५/२०२६
अनंत रामभाउ वानखेडे वि.
महाराष्ट्र शासन -
दिंडोरी पोलीस स्टेशन,
ता. दिंडोरी, जि. नाशिक.

## नि.क्र. १ खालील आदेश

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दिंडोरी पोलीस स्टेशन यांचेकडील गु.र.क्र.२०/२०२६ मध्ये जप्त केलेली इंडीया यामाहा कंपनीची मॅट ब्लॅक २ रंगाची मोटर सायकल जिचा नोंदणी क्र. एम.एच.-१५-एच.जे.-१६५२ चेसीस क्र. ME1RG6629L0070837 व इंजिन क्र. G3N5E0072604 (यापुढे सोईकरिता 'जप्त वाहन' असा उल्लेख) चा अंतरिम ताबा मिळावा याकरिता भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ५०३ नुसार दाखल केलेला आहे.

०२. अर्जदाराचे असे कथन आहे की, प्रस्तुत जप्त मोटर सायकल ही त्याच्या मालकीची आहे. पोलीसांनी प्रस्तुत वाहन जप्त केल्यापासून ते पोलीस ठाण्याच्या आवारात उभे आहे त्यामुळे त्याचे नुकसान होण्याचा संभव आहे. अर्जदारास त्याचे दैनंदीन कामासाठी सदर वाहनाची अत्यंत आवश्यकता आहे. सबब, सदर वाहनाचा अंतरिम ताबा मिळणेकरिता आदेश व्हावेत अशी विनंती अर्जदाराने केलेली आहे.

०३. प्रस्तुत अर्जातील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. तपासी अंमलदार यांनी त्यांचे म्हणणे सादर करुन सदर जप्त वाहन अर्जदारास अटी व शर्तीवर देण्यास त्यांची हरकत नसल्याचे कथन केले आहे. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे म्हणणे पाहिले. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी प्रस्तुत अर्जाकामी निशाणी क्र.१ वर त्यांचे म्हणणे सादर केले असुन सदर जप्त मुद्देमाल अर्जदारास योग्य त्या अटी व शर्तीवर परत

देणेस हरकत नसल्याबाबत कथन केले आहे.

**०५.** अर्जदाराच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अर्जदाराने त्यांच्या कथनाच्या पुष्ठर्थ त्याचे स्वतःचे प्रतिज्ञापत्र (नि.क्र.४), नि.क्र.३ लगत एफ.आय.आर ची प्रत, सदर वाहनाचे आर.सी. बुकची छायांकित प्रत, सदर वाहनाचे इन्शुरंन्स पावतीची छायांकित प्रत व अर्जदाराचे आधारकार्डची साक्षांकित प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केले आहेत. सदर दाखल कागदपत्रांचे अवलोकन करता असे निदर्शनास येते की, अर्जदाराचे नावे प्रस्तुत जप्त वाहन नोंदणीकृत आहे. त्याचे व्यतिरिक्त इतर कोणीही व्यक्ती सदर वाहनावर हक्क सांगत नाही.

**०६.** उपरोक्त संदर्भीय न्यायनिर्णयाचा आधार घेता आणि मा. सर्वोच्च न्यायालयाने Sundarlal Ambalal Desai versus State of Gujarat (AIR 2003 S C 628), मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, प्रस्तुत अर्जदार हा सदर जप्त वाहनाचा ताबा मिळण्यास पात्र आहे, त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही सदर वाहनावर हक्क सांगणारी व्यक्ती समोर आली नाही. सबब प्रस्तुत अंतरिम ताबा मिळण्यास अर्जदार पात्र ठरतो. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आ दे श

१. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. दिंडोरी पोलीस स्टेशन यांचेकडील गु.र.क्र.२०/२०२६ मध्ये जप्त केलेली इंडीया यामाहा कंपनीची मॅट ब्लॅक २ रंगाची मोटर सायकल जिचा नोंदणी क्र. एम.एच.-१५-एच.जे.-१६५२ चेसीस क्र. ME1RG6629L0070837 व इंजिन क्र. G3N5E0072604 चा अंतरिम ताबा अर्जदारास द्यावा. त्याकरिता अर्जदाराने रुपये ५०० च्या मुद्रांक शुल्कावर २०,०००/- (रुपये वीस हजार फक्त) रुपये किमतीचा इंडेमनिटी बॉण्ड भरुन दयावा.

३. प्रस्तुत गुन्हयाचे तपासी अंमलदार यांना असे आदेश देण्यात येतात की, सदर मुद्देमाल अर्जदाराच्या ताब्यात देताना त्याची छायाचित्रे आणि पंचनामा तयार करावा आणि ती प्रस्तुत खटल्यात दाखल करावीत.

४. अर्जदारास असेही आदेशीत करण्यात येते की, प्रस्तुत खटल्याचा निकाल होईपावेतो अर्जदाराने सदर वाहन कोणासही दान, गहाण, विक्री देवु नये किंवा नष्ट करुन नये आणि इतर कोणत्याही स्वरुपात बदल होईल अशी कोणतीही कृती या न्यायालयाच्या पुर्व परवानगीशिवाय करु नये.

५. संबंधीतांना सदर आदेशाबाबतचे पत्र अग्रेषीत करण्यात यावे.

SHRUTI CHANDRAKANT NIRMALE

Digitally signed by SHRUTI CHANDRAKANT NIRMALE
Date: 2026.03.16 12:24:07 +0530

दिनांक ११/०३/२०२६

( एस. सी. निर्मळे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
दिंडोरी.